अधिसूचना

क्रमांक :- २१२/२०२५ दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२५

विषय :- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ..... अधिष्ठाता तद्र्थ नामनिर्देशनाबाबत.

संदर्भ :- १) असाधारण अधिसूचना क्रमांक ३०/२०१८, दिनांक १३.४.२०१८

२) असाधारण अधिसूचना क्रमांक ३५/२०१९, दिनांक १६.४.२०१९

३) असाधारण अधिसूचना क्रमांक ४०/२०२०, दिनांक २०.४.२०२०

४) असाधारण अधिसूचना क्रमांक ४/२०२१, दिनांक ७.१.२०२१

५) असाधारण अधिसूचना क्रमांक ४०/२०२१, दिनांक १६.४.२०२१

६) असाधारण अधिसूचना क्रमांक ५३/२०२१, दिनांक २.६.२०२१

७) असाधारण अधिसूचना क्रमांक ९२/२०२१, दिनांक ४.१०.२०२१

८) असाधारण अधिसूचना क्रमांक १७/२०२३, दिनांक ६.२.२०२३

९) असाधारण अधिसूचना क्रमांक २११/२०२३, दिनांक २९.१२.२०२३

१०) असाधारण अधिसूचना क्रमांक ८/२०२४, दिनांक १.२.२०२४

११) डॉ.डी.व्ही.निचीत, तद्र्थ अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांचे दिनांक १२.११.२०२५ रोजीचे पत्र.

संदर्भीय क्रमांक १ वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून अधिसूचनेतील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांकरिता अधिष्ठात्यांचे तद्र्थ नामनिर्देशन करण्यात आले होते.

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, संदर्भीय क्रमांक ४ व ५ वरील अधिसूचनेच्या माध्यमातून अधिसूचनेमध्ये वरील उल्लेखित विद्याशाखांचे तद्र्थ अधिष्ठाते, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) चे कलम १५(३) च्या परंतुकान्वये मा.कुलगुरूंनी संदर्भ क्रमांक १० वरील अधिसूचनेद्वारे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे तद्र्थ अधिष्ठाता पदावर डॉ.डी.डब्ल्यु.निचित यांचे नामनिर्देशित करण्यात आले होते.

तथापि, संदर्भ क्रमांक ११ वरील पत्रान्वये डॉ.डी.डब्ल्यु.निचित यांनी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे तद्र्थ अधिष्ठाता पदाचा राजीनामा दिल्यामुळे, मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार **प्रा.डॉ.अरूण हरणे, विभागप्रमुख वाणिज्य, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती** यांचेकडे दिनांक १३.११.२०२५ पासून नव्याने नामनिर्देशन होईपर्यंत किंवा नविन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे तद्र्थ अधिष्ठाता पदाचे नामनिर्देशनाला मान्यता प्रदान केली आहे.

स्वा/-

(डॉ.अविनाश असनारे)

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****